महाराष्ट्र विधानसभा नियम
(प) पंचायती राज समिती

२३९.(१) दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा, यथास्थिति, नवीन रचना करण्यात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, पंचायत राज समितीची रचना करण्यात येईल. पंचायती राज समितीची रचना.

(२) पंचायत राज समिती ही, पंचवीसपेक्षा* अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल. त्यापैकी वीसपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य हे, विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्षांद्वारे नामनिर्देशित करण्यात येतील आणि त्याचप्रमाणे, पाचपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विधानपरिषदेच्या सदस्यांमधून तिच्या सभापतीद्वारे, नामनिर्देशित करण्यात येतील.

परंतु, विधानसभेतून नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या वीस सदस्यांमधील दोन सदस्य हे अनुसूचित जातीचे व दोन सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.

(३) समितीचे सदस्य, नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

२४०. (१) पंचायत राज समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील :--- समितीची कामे

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याच्या कलम १४२ (४) अन्वये विधानमंडळास सादर करण्यात येणाऱ्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या वार्षिक प्रशासनिक अहवालाची तपासणी करणे ;

(ब) मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, यांनी तयार केलेल्या व शासनाने विधानमंडळाला सादर केलेल्या जिल्हा परिषदांच्या वित्तविषयक एकत्रित लेख्यांची व जिल्हा परिषदांच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाची तपासणी करणे ;

. पहा शासन राजपत्र, असाधारण, भाग चार क्र., दिनांक १ ऑगस्ट, १९७८.

. पहा शासन राजपत्र, असाधारण, भाग चार क्र., दिनांक २२ एप्रिल, १९८१.

(क) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या अर्थसंकल्पासंबंधात व लेख्यासंबंधात लोकलेखा समितीची व अंदाज समितीची कामे करणे.

परंतु, समिती पुढील बाबींपैकी, कोणत्याही बाबीसंबंधात तपासणी व अन्वेषण करणार नाही :--

(एक) शासनाच्या महत्वाच्या धोरणविषयक बाबी ;

(दोन) जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या दैनंदिन प्रशासनविषयक बाबी ; व

(तीन) ज्यांच्या विचारार्थ विशेष यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे अशा बाबी :

आणखी असे की, नियम १७६ च्या तरतुदींच्या अधीन राहून, ----

(अ) शासनाचा ग्रामविकास विभाग हा समितीस आवश्यक असेल अशी माहिती व कागदपत्रे जिल्हा परिषदांकडून वेळोवेळी मागवील व ती समितीच्या उपयोगासाठी विधानमंडळ सचिवालयाकडे सादर करील.

(ब) समितीस, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, जिल्हा परिषदांच्या विषय समित्यांचे सभापती, पंचायत समित्यांचे सभापती व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर कोणतेही अधिकारी यांची तपासणी करता येईल.

महाराष्ट्र विधानपरिषद नियम

२१२. *दरवर्षी, विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, विधानसभेने केलेल्या नियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या पंचायत राज समितीवर प्रतिनिधित्व करण्यासाठी, सभापती जास्तीत जास्त पाच सदस्यांना नामनिर्देशित करतील. पंचायती राज समिती

---

* पहा शासन राजपत्र, असाधारण भाग चार क्र. दिनांक २२ एप्रिल, १९८१.

संसदीय कार्यपध्दती
संक्षिप्त मालिका

विधानसभा
पुस्तक क्र. १०

पंचायती राज समिती

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
ऑक्टोबर, २००४

प्रस्तावना

संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये विधानमंडळाच्या समित्या शासनावर संपूर्ण व प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवण्याची जबाबदारी पार पाडीत आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ (४८) अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा वार्षिक प्रशासन तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल विधानमंडळास सादर झाल्यानंतर पंचायती राज समिती जिल्हा परिषदांचे एकत्रित वित्तीय महसुली लेखे व जिल्हा परिषदांचे लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल यांचे परीक्षण करते. जिल्हा परिषदा प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करुन त्यातील त्रुटी शोधून योजना कार्यक्षमरित्या अंमलबजावणीसाठी शासनाला विविध शिफारशी करुन प्रशासनाला गती देण्याची महत्वाचे काम ही समिती पार पाडते.

भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार घटनेच्या अनुच्छेद २४३ (जी-४) अनुसूची ११ मधील विषय पंचायती राज संस्थांकडे देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने जिल्हा परिषदांच्या आर्थिक व प्रशासकीय जबाबदारीत वाढ झालेली आहे. त्यामुळे वित्तीय नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊन प्रशासकीय शिस्त वाढीस लागण्यासाठी त्यातील त्रुटी, दोष व वित्तीय अनियमितता सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी पंचायती राज समितीची आहे. त्यामुळे या समितीचे महत्व अनन्यसाधारण आहे.

पंचायती राज समिती स्थापन करण्यामागील उद्देश, हेतू, संबंधित नियम, समितीच्या कामकाजाची कार्यपध्दती, समितीने सादर केलेले अहवाल, त्यातील महत्वाच्या शिफारशी यांची संक्षिप्त माहिती या पुस्तिकेत अंतर्भूत करण्यात आली आहे. ही पुस्तिका सदस्यांना उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

विधान भवन :
मुंबई,
ऑक्टोंबर, २००४.

विलास पाटील,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

प्रस्तावना

संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाच्या समित्या प्रशासनावर संपूर्ण व प्रभावी नियंत्रण व देखरेख ठेवण्याची जबाबदारी पार पाडीत आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ (४) अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा वार्षिक प्रशासन तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल विधानमंडळास सादर झाल्यानंतर पंचायती राज समिती जिल्हा परिषदांचे एकत्रित वित्तीय महसुली लेखे व जिल्हा परिषदांचे लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल यांचे परीक्षण करते. जिल्हा परिषदा प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करुन त्यातील त्रुटी शोधून योजना कार्यक्षमरित्या अंमलबजावणीसाठी शासनाला विविध शिफारशी करुन प्रशासनाला गती देण्याचे महत्त्वाचे काम ही समिती पार पाडते.

भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार घटनेच्या अनुच्छेद २४२ (जी-४) अनुसूची ११ मधील विषय पंचायती राज संस्थांकडे देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने जिल्हा परिषदांच्या आर्थिक व प्रशासकीय जबाबदारीत वाढ झालेली आहे. त्यामुळे वित्तीय नियमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होऊन प्रशासकीय शिस्त वाढीस लागण्यासाठी त्यातील त्रुटी, दोष व वित्तीय अनियमितता सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी पंचायती राज समितीची आहे. त्यामुळे या समितीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

पंचायती राज समिती स्थापन करण्यामागील उद्देश, हेतू, संबंधित नियम, समितीच्या कामकाजाची कार्यपद्धती, समितीने सादर केलेले अहवाल, त्यातील महत्त्वाच्या शिफारशी यांची संक्षिप्त माहिती या पुस्तिकेत अंतर्भूत करण्यात आली आहे. ही पुस्तिका सदस्यांना उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

विधान भवन :
मुंबई,
ऑक्टोबर, २००४.

विलास पाटील,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

पंचायती राज समिती
समितीची रचना, कार्यपद्धती व कामे

समितीची स्थापना

कार्यकारी प्रशासनाचा संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण प्रभावी व अर्थपूर्ण (Effective and meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याच्या उद्देशाने विधानमंडळ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि राज्यघटनेत अंतर्भूत असलेली न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे गावपातळीपासून आचरणात आणण्यासाठी ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत सत्तेचे विकेंद्रीकरण करुन ग्रामीण भागातील जनतेला शासनाच्या कामकाजामध्ये सहभागी होता यावे या उद्देशाने पं.जवाहरलाल नेहरु यांनी सन १९५६ मध्ये बलवंतराव मेहता समितीची स्थापना केली. श्री.बलवंतराय मेहता यांनी दिनांक २ ऑक्टोबर, १९५९ रोजी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अशा त्रिस्तरीय पद्धती असावी असा अहवाल शासनाला सादर केला. या अहवालात गावपातळीच्या विकासासाठी गावकऱ्यांचा सहभाग तसेच सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. हा प्रस्ताव शासनाने स्वीकारला. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात सन १९६२ मध्ये जिल्हा परिषदा स्थापन करण्यात आल्या. शासनाकडून जिल्हा परिषदांना विविध योजना व कार्यक्रम राबविण्यासाठी दरवर्षी अनुदानाच्या रुपाने रकमा दिल्या जातात. या रकमांचा विनियोग योग्य प्रकारे करुन योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करुन शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील लोकांना मिळण्याच्या उद्देशाने या संस्थांची स्थापना झाली.

जिल्हा परिषदांच्या कारभारावर विधिमंडळाचे नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विधान कार्य मंत्र्यांनी दिनांक २८ मार्च, १९७३ रोजी विधानसभेत पुढीलप्रमाणे ठराव मांडला :-

"हे सभागृह असा ठराव करीत आहे की,-

(१) (अ) एकल संक्रमणीय मतदानाने आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार दोन्ही सभागृहातील सदस्यांमधून निवडून द्यावयाच्या विधानसभेतील १५ व विधानपरिषदेतील ४ अशा एकूण १९ सदस्यांची "पंचायती राज समिती" या नावाच्या एका समितीची रचना करण्यात

यावी आणि त्यासाठी मतदान हे गुप्त मतदान पद्धतीनुसार घेण्यात यावे. सदर १५ सदस्यांपैकी दोन सदस्य अनुसूचित जातीचे व दोन सदस्य अनुसूचित जमातीचे असावेत आणि त्यांची निवडही एकल संक्रमणीय मतदानाद्वारे व प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार करण्यात यावी.

(ब) कोणताही मंत्री या समितीचा सभासद म्हणून निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही आणि एखादा सदस्य समितीवरील आपल्या निवडीनंतर मंत्री म्हणून नियुक्त झाल्यास, तो अशा नियुक्तीच्या तारखेपासून समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल."

उपरोक्त ठरावावर दिनांक २८ व २९ मार्च, १९७३ रोजी विधानसभेत चर्चा झाली. चर्चेअंती दिनांक २९ मार्च, १९७३ रोजी ठराव संमत झाला.

विधानपरिषदेत या ठरावावर दिनांक ३० मार्च, १९७३ रोजी चर्चा होऊन ठराव संमत झाला. महाराष्ट्र विधानमंडळाने मार्च, १९७३ मध्ये पारित केलेल्या या ठरावानुसार पंचायती राज समितीची स्थापना करण्यात आली.

समितीची रचना

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २३९ मधील तरतुदीनुसार ही समिती दरवर्षी गठीत करण्यात येते. सन १९८०-८१ पर्यंत समिती निवडणुकीद्वारा गठीत होत असे आणि समितीची सदस्य संख्या १९ असे. परंतु १९८१-८२ पासून समिती मा.अध्यक्षांकडून नामनिर्देशित होत असून समितीच्या सदस्यांच्या संख्या देखील १९ वरुन २५ वर नेण्यात आली आहे. समितीच्या २५ सदस्यांपैकी २० विधानसभा सदस्य मा.अध्यक्षांकडून नामनिर्देशित करण्यात येतात व त्यापैकी दोन सदस्य अनुसूचित जातीचे व दोन सदस्य अनुसूचित जमातीचे असतात व पाच विधानपरिषद सदस्य मा.सभापतींकडून नामनिर्देशित केले जातात.

समिती प्रमुखांची नियुक्ती

पंचायती राज समितीच्या समिती प्रमुखांची मा.अध्यक्षांकडून नियुक्ती केली जाते.

समितीचा कालावधी

समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत त्या पदावर राहतात. मंत्री समितीचा सदस्य असत नाही. एखादा सदस्य मंत्री म्हणून नियुक्त झाल्यास ते अशा नियुक्तीच्या तारखेपासून समितीचा सदस्य असल्याचे स्थगित होते.

समितीवरील सदस्यत्वाचा राजीनामा

सदस्यांना स्वत:च्या सहीने अध्यक्ष/सभापती यांना लेखी कळवून समिती सदस्यत्वाचा राजीनामा देता येतो. तसेच जर एखादा सदस्य समितीच्या लागोपाठच्या दोन किंवा अधिक बैठकीस समिती प्रमुखांच्या परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास अशा सदस्यांस समितीतून काढून टाकण्याबाबत समिती प्रमुख अध्यक्ष/सभापती यांना शिफारस करु शकतात.

समितीच्या बैठका

विधानसभा नियमांतील नियम १७३ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठका, समिती प्रमुख निश्चित करतील अशा दिवशी व अशा वेळी भरतात. परंतु समिती प्रमुख सहजगत्या उपलब्ध नसतील तर सचिवांना बैठकीचा दिनांक व वेह ठरविता येतो. तसेच विधानसभा नियमांतील नियम १७६ मधील तरतूदीनुसार समितीच्या बैठका विधान भवनाच्या प्रसीमेत भरविण्यात येतील आणि बैठकीची जागा बदलून ती विधान भवनाच्या बाहेर ठेवणे आवश्यक असेल तर ती बाब अध्यक्षांच्या परवानगीसाठी ठेवण्यात येते व याबाबतीत अध्यक्षांचा निर्णय अंतिम असतो.

उप समिती नेमणे

समितीचा कालावधी एक वर्षाचा असतो आणि या कालावधीत राज्यातील एकूण ३३ जिल्हा परिषदांपैकी काही निवडक जिल्हा परिषदा भेटीसाठी निवडल्या जातात. निवडलेल्या जिल्हा परिषदांच्या पंचायत समित्यांची तपासणी करण्यासाठी तीन किंवा चार सदस्यांचा याप्रमाणे एक किंवा अधिक अशा उप समित्या नेमल्या जातात. उप समितीने दिलेला अहवाल समिती विचारात घेते.

समितीच्या बैठका गुप्त असणे

विधानसभा नियम क्रमांक १७५ अन्वये समितीच्या बैठका गुप्तपणे भरविण्यात आल्या पाहिजेत.

समितीच्या कामाची गोपनीयता

१. समितीचे कामकाज गोपनीय असते, त्यामुळे त्या कामाचा अहवाल सभागृहास सादर होईपर्यंत उघड करता येत नाही. तसेच त्याबाबत सदस्यांना सभागृहात प्रश्न देखील विचारता येत नाही.

२. म.वि.स. नियम क्रमांक १७७ नुसार समिती जेव्हा जेव्हा चर्चा करीत असेल तेव्हा समितीचे सदस्य आणि महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे अधिकारी यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व व्यक्तींनी तेथून निघून गेले पाहिजे.

३. महाराष्ट्र विधानसभा नियम १७८ नुसार समितीला एखाद्या विषयाच्या तपासणी संबंधात आवश्यक असलेल्या व्यक्तींना बोलविण्याचा आणि त्यासंबंधीचे कागदपत्र व अभिलेख मागविण्याचा अधिकार आहे.

वार्ताहरांसाठी माहिती

समितीच्या बैठका वृत्तपत्राच्या वार्ताहरांकरिता खुल्या नसतात. तथापि, समिती प्रमुखांनी निदेश दिले तर फक्त समितीने त्या दिवशी परिक्षिलेल्या विभागाची नावे, जिल्हा परिषदांची नावे यासंबंधीची माहिती वार्ताहरांसाठी देता येते.

साक्षीदारांनी अनुसरावयाची वागणूक व शिष्टाचार

१. साक्षीदारांनी आपल्या जागेवर बसताना किंवा जागेवरुन उठताना वाकून समिती प्रमुख व अभ्यास गट / उप समितीबद्दल योग्य तो आदर दाखविला पाहिजे.

२. साक्षीदाराने त्या समिती प्रमुखाने किंवा एखाद्या सभासदाने विचारलेल्या विशिष्ट प्रश्नास उत्तर दिले पाहिजे.

३. समिती प्रमुख व समितीसमोर मांडावयाचे सर्व मुद्दे सभ्य व विनयशील भाषेत, स्पष्ट शब्दात मांडण्यात आले पाहिजेत.

४. महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून पुढील कृत्यांमुळे समितीचा विशेष हक्कभंग व अवमान होतो :-

(अ) विचारण्यात आलेली माहिती उघड न करणे, राज्याच्या सुरक्षिततेस किंवा हितसंबंधास अपायकारक ठरेल या कारणांखेरीज इतर कोणत्याही कारणावरुन प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देणे.

(ब) खोटी साक्ष तयार करणे किंवा जाणूनबुजून खोटी साक्ष देणे किंवा सत्य दडवणे किंवा समितीची दिशाभूल करणे.

(क) क्षुल्लक गोष्टींसाठी समितीचा वेळ घेणे किंवा अपमानकारक उत्तरे देणे.

(ड) चौकशीच्या संबंधित असा एखादा महत्त्वाचा दस्तऐवज नष्ट करणे किंवा त्याची नुकसानी करणे.

समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजणे

समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजण्यात येतील व त्यातील मजकूर दुसऱ्या कोणासही कळविण्यात येणार नाही किंवा त्याचा उल्लेख समितीच्या बाहेर कोणत्याही वेळी करण्यात येणार नाही. सभागृहासमोर ठेवलेल्या कागदपत्रात किंवा अभिलेखात असलेल्या माहितीचाच फक्त उल्लेख करता येईल.

समितीचे कामकाज

१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १४२ (४) अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या वार्षिक प्रशासन तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल विधानमंडळास सादर करणे.

२. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे वार्षिक प्रशासन अहवाल आणि मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांनी तयार केलेले व शासनाने विधानमंडळास सादर केलेले जिल्हा परिषदांचे एकत्रित वित्तीय महसुली लेखे व जिल्हा परिषदांचे लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल यांचे परीरक्षण करणे.

३. लोकलेखा समिती व अंदाज समिती राज्यांचे अंदाजपत्रक व लेखे याची तपासणी व छाननी करते. त्याच धर्तीवर ही समिती जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांची अंदाजपत्रके व लेखे यांची तपासणी व छाननी करते.

४. समितीच्या कक्षेत पुढील बाबी येत नाहीत :-

(१) शासनाच्या प्रमुख धोरणविषयक बाबी.

(२) जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या दैनंदिन प्रशासन विषयक बाबी.

(३) ज्यांच्या विचारार्थ विशेष यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे अशा बाबी.

५. कामाची कार्यपध्दती

विधानमंडळाच्या उभय सभागृहाला जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल नियमानुसार सादर होतात.परंतु सर्व जिल्हा परिषदांच्या प्रशासन अहवालाच्या संदर्भात सखोल तपासणी करणे समितीला वेळे अभावी शक्य होत नाही. सबब, काही निवडक जिल्हा परिषदांची त्यांच्या प्रशासन अहवालाच्या संदर्भात सखोल तपासणी करण्याची कार्यपध्दत आजपर्यंत अनुसरण्यात आली आहे.

६. जिल्हा परिषदांच्या प्रशासनविषयक बाबीसंबंधी तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात तपासणी करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात येते -

जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल शासनाकडून सभागृहास सादर झाल्यानंतर

(एक) जिल्हा परिषदेच्या कारभाराची स्थूलमानाने तपासणी करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आलेल्या विषयासंबंधात सर्वसाधारण स्वरुपाची प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती सर्व जिल्हापरिषदांना पाठविण्यात येते.

(दोन) सखोल तपासणी करण्यासाठी निवडण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या बाबतीत त्यांच्या वार्षिक प्रशासन अहवालातील माहितीच्या आधारे विशेष मुद्यांवर अधिक माहितीकरिता प्रश्नावली तयार करुन ती संबंधित जिल्हापरिषदेकडे पाठविण्यात येते.

(तीन) जिल्हा परिषदेच्या प्रशासनात पंचायत समितीच्या कारभाराचे महत्वाचे स्थान असते हे लक्षात घेऊन पंचायत समितीच्या कारभाराविषयी सर्वसाधारण स्वरुपाची प्रश्नावली तयार करण्यात येऊन ती सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात येते.

(चार) या शिवाय सर्वसाधारण प्रश्नावलीच्या अनुषंगाने स्थूलमानाने तपासणी करण्यात येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या कोणत्याही पंचायत समितीच्या कारभाराची पाहणी पंचायत समितीकरिता असलेल्या प्रश्नावलीच्या अनुरोधाने करावयाची ठरल्यास ती प्रश्नावली संबंधित जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात येते.

(पाच) जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील एखाद्या ग्रामपंचायतीच्या कारभाराची पहाणीदेखील ग्रामपंचायतीकडे जिल्हा परिषदेने सोपविलेल्या कामाच्या तसेच तद्नुषंगिक बाबीसंबंधात ग्रामपंचायतीकरिता तयार केलेल्या सर्वसाधारण स्वरुपाच्या प्रश्नावलीनुसार समितीकडून पाहणी करण्यात येते अशी पाहणी विशेष करुन सखोल परीक्षणाकरिता निवडलेल्या जिल्हा परिषदेच्या क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या संबंधात करण्याची प्रथा आहे.

७. लेखापरीक्ष पुनर्विलोकन अहवाल सभागृहास सादर झाल्यानंतर त्यातील परिच्छेदावर संबंधित जिल्हा परिषदेकडून माहिती व खुलासे प्राप्त होतात.

८. जिल्हा परिषदांच्या कारभाराचे परिशीलन करण्याकरिता तयार केलेल्या प्रश्नावलीची उत्तरे संबंधित जिल्हा परिषदेकडून साधारणतः २ ते ३ महिन्यांच्या कालावधीत प्राप्त होतात. अशा प्रकारे प्राप्त झालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने ठरविलेल्या जिल्हापरिषदांना भेट देऊन समिती जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, मूख्य कार्यकारी अधिकारी व अन्य अधिकारी यांची साक्ष घेते. तसेच आवश्यकतेनुसार जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती मंत्रालयीन विभागीय सचिवांचीही साक्ष घेते. साक्षीत प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समिती आपला अहवाल तयार करुन सभागृहास सादर करते.

९. याशिवाय पूर्वीच्या समितीने सभागृहास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीवर शासनाने केलेल्यास कारवाईच्या संदर्भात समिती मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची साक्ष घेते व मिळालेल्या माहितीच्या आधारे अनुपालन अहवाल तयार करुन ती देखील सभागृहास सादर करीत असते.

१०. निरनिराळया विषयांचा तपशीलवार अभ्यास व तपासणी करण्यासाठी समिती एक किंवा अधिक अभ्यासगट आणि / किंवा उप समित्या वेळोवेळी नियुक्त करु शकते.

अभ्यास गटाची आणि / किंवा उपसमितीची कामे, इतर गोष्टींबरोबर पुढीलप्रमाणे असतात

(एक) ग्रामविकास विभागाकडून मिळालेल्या किंवा विभागाने पुरविलेल्या साहित्याचा सखोल अभ्यास करणे

(दोन) समिती प्रमुखाने मान्यता दिल्यानंतर ग्रामविकास विभागाला द्यावयाची प्रश्नावली तयार करणे

(तीन) ग्रामविकास विभागाकडून आलेल्या उत्तराची तपासणी करणे व ती विचारात धेणे.

(चार) समितीने किंवा समिती प्रमुखाने पाठविलेल्या कोणत्याही प्रकरणाचा अभ्यास करणे व त्यावर अहवाल सादर करणे.

(पाच) अभ्यास दौरे काढणे व त्यावरील अभ्यास टिप्पण्या तयार करणे.

(सहा) ज्यांच्या आधारावर अहवालाचा मसुदा तयार करता येईल असे ठळक मुद्दे काढणे.

(सात) अहवालाचा मसुदा संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

(आठ) अगोदरच्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत ग्रामविकास विभागाकडून आलेल्या उत्तरांची छाननी करणे.

(नऊ) अगोदरच्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत त्यांच्या आधारावर अहवालाचा मसुदा तयार करता येईल असे मुद्दे काढणे.

(दहा) अगोदरच्या अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत अहवालाचा मसुदा संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

अभ्यासगट आणि/किंवा उप समिती ही, आवश्यक वाटेल त्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या विषय समितीचा प्रमुख, पंचायत समित्यांचे सभापती, जिल्हा परिषंदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा इतर अधिकारी किंवा शासनाच्या संबंधित विभागाचे प्रतिनिधी यांची तोंडी तपासणी करु शकते.

शब्दश: कार्यवृत्त:-

१. शब्दश: कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील आणि सभागृहासमोर ठेवण्यात आलेले अशा प्रकारचे कागदपत्र केवळ जनतेसाठी खुले राहतील.

२. सबंध पुरावा किंवा त्याचा कोणताही भाग मुद्रित करण्याचे समिती ठरवील तेव्हा तो वेगळया खंडाच्या स्वरुपात मुद्रित करण्यात येईल आणि समिती हाताळीत असलेल्या विषयावरील अहवालाचा तो एक भाग होईल.

बैठकीचे कार्यवृत्त :- समिती प्रमुखांच्या अनुमोदनासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय समितीच्या अभ्यासगटाच्या/ उप समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांचे मसुदे तयार करील.

कार्यवृत्त परिसृत करणे :- समितीच्या प्रत्येक बैठकीचे कार्यवृत्त समितीच्या सदस्यांकडे परिसृत करण्यात येईल. समितीच्या सहमतीने असे कार्यवृत्त अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

११. अहवालाचा मसुदा तयार करणे

समिततीने केलेल्या शिफारशीच्या अहवालाचा मसुदा तयार करण्यात येऊन तो मसुदा समिती प्रमुखांना सादर करण्यात येतो.

१२. अहवाल सादर करणे

प्रत्येक अहवालाचा मसुदा किंवा त्याचा भाग समितीच्या बैठकीमध्ये विचारात घेण्यात येतो आणि उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या बहुसंख्य सदस्यांच्या निर्णयाचा यात अंतर्भाव असतो. त्यानंतर समिती प्रमुख समितीच्या वतीने त्यावर स्वाक्षरी करतात व तो मुद्रित करण्यात येतो आणि सभागृहाला सादर करण्यात येतो.

१३. अहवालाचे वितरण

सभागृहाला अहवाल सादर केल्यानंतर त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानसभा/विधानपरिषद सदस्य आणि संबंधित विभाग इत्यादींना उपलब्ध करुन देण्यात येतात.

पंचायती राज समितीने आपल्या अहवालात खालीलप्रमाणे काही महत्वपूर्ण अशा शिफारशी केलेल्या आहेत. या संदर्भातील काही उदाहरणे खालीलप्रमाणे उद्धृत करण्यात येत आहेत :-

१. पहिला अहवाल (१९८५-८६)

सबब, यापुढे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ५४ (२) अन्वये ज्या ज्या प्रकरणांना मा. अध्यक्षांनी मान्यता दिली असेल त्या सर्व

प्रकरणांबाबतची सविस्तर माहिती वार्षिक प्रशासन अहवालामध्ये नमूद करण्याबाबत जिल्हा परिषदेने खबरदारी घ्यावी अशा सूचना शासनाने सर्व जिल्हा परिषदांना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे. तसेच कलम ५४(२) च्या वापरासंबंधात शासनाने दिनांक १२ मे, १९७८ तसेच दिनांक १३ ऑगस्ट ,१९७८ रोजी जारी केलेल्या परिपत्रकामध्ये ठरवून दिलेल्या मागदर्शक तत्वांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांनी काटेकोरपणे करावी अशीही समितीची सूचना आहे.

२. अठरावा अहवाल (१९९३-९४)

जिल्हा परिषदांचा विकासाचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविणे व त्यासाठी शास्त्रशुध्द व अचूक अंदाजपत्रक तयार करणे जिल्हा परिषदांना शक्य व्हावे यासाठी अडचणीतून मार्ग काढणे अतिशय गरजेचे आहे व त्यादृष्टीने गत तीन वर्षात दर तिमाहीत त्यांना देण्यात आलेल्या उपकराच्या रकमेची सरासरी काढून त्या रकमेइतकी रक्कम शासनादेशानुसार विहित केलेल्या कालमर्यादेत देणे व फरकाची रक्कम नंतरच्या तीन महिन्यांच्या आत देणे सहज शक्य आहे, असे समितीचे मत आहे आणि म्हणून याबाबतीत शासनाने गंभीरपणे विचार करावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. जिल्हा परिषदांना उपकराची रक्कम विहित कालमर्यादेत जिल्हा अधिकाऱ्यांकडून दिली जात असल्याबाबत खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने व त्यावर शासनाने नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने जिल्हा अधिकाऱ्यांकडून त्याबाबतचा तपशील दर तिमाहीस महसूल व वन विभागास (महसूल) सादर करणे जिल्हा अधिकाऱ्यांवर बंधनकारक करावे व जिल्हा परिषदांना उपकराची रक्कम विहीत कालमर्यादेत अदा करण्याबाबत कसूर करणाऱ्या संबंधितांविरुध्द उच्च स्तरावर चौकशी करण्यात यावी व चौकशीमध्ये दोषी आढळून येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द नियमानुसार कारवाई करावी अशीही समितीची शिफारस आहे.

३. पहिला अहवाल (१९९५-९६)

(१)निविदा मागविण्यासाठी वृत्तपत्रांत जाहिराती देण्यासाठी जो विशिष्ट कालावधी लेखा संहितेनुसार विहित करण्यात आलेला आहे त्या विहित कालावधीने बंधन प्रत्येक जिल्हा परिषदेने वृत्तपत्रात निविदा देतेवेळी कोणत्याही परिस्थित्ीत काटेकोरपणे पालन केले पाहीजे. निविदेबाबतची सूचना जिल्हा परिषदेच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावली नाही व

विहित केलेल्या कालावधीच्या अटींची पूर्तता केली नाही असे प्रकार यापुढे जिल्हा परिषदांकडून होऊ नयेत याबाबत राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट सूचना विभागातर्फे देण्यात याव्यात.

(२) वैयक्तिक लाभांच्या योजनांना प्रथम प्रशासकीय मान्यता व नंतर तांत्रिक मान्यता असे प्रकार होऊ नयेत तसेच लाभार्थींची निवड होण्यापूर्वी वस्तुंची खरेदी करण्यात येऊ नये याबाबत जिल्हा परिषदांना स्पष्ट आदेश देण्यात यावेत. याउपरही असे गैरप्रकार आढळून आल्यास त्यांची गंभीर दखल शासनाने घ्यावी.

(३) सदरहू योजने अंतर्गत कमी दराची निविदा नाकारुन जास्त दरांची निविदा स्वीकारल्यामुळे जिल्हा परिषदेने केलेल्या अनियमिततेबाबत शासन स्तरावरुन संपूर्ण चौकशी करण्यात यावी आणि याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या व्यक्तीविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी आणि केलेल्या कारवाईची माहिती समितीला सहा महिन्यांच्या कालावधीत देण्यात यावी.

(४) आर्थिक वर्ष संपण्यासाठी फक्त काही दिवसांचा कालावधी शिल्लक असताना कलम ५४ (२) चा वापर मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचेकडून होऊ नये याबाबत शासनाने निश्चित असा निर्णय घ्यावा व त्या निर्णयाची माहिती राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना द्यावी.

(५) जिल्हा परिषदांतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत लाभार्थींना वाटप करावयाच्या वस्तुंची खरेदी घाईगर्दीने वर्ष संपण्यापूर्वीच करणे मात्र वस्तुंचे वाटप यथावकाश करणे यासंबंधात समितीने यापूर्वी व्यक्त केलेले अभिप्राय विचारात घेऊन आर्थिक शिस्तीचे जिल्हा परिषदांकडून कटाक्षाने पालन होण्यासाठी शासनाकडून सर्व जिल्हा परिषदांना विस्तृत स्वरुपाच्या मार्गदर्शक सूचना तात्काळ देण्यात याव्यात.

४. अकरावा अहवाल (१९९८-९९)

समितीने या व इतर काही जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता खरेदीबाबत परिस्थिती थोडया फार फरकाने सर्वत्र सारखी असल्याचे समितीस आढळून आले. ३१ मार्च रोजी संबंधित निधी घाईघाईने खर्ची टाकण्यात येतो. खरेदीबाबतची विहित प्रक्रिया व शासकीय शर्ती, अटी अथवा मानके घाईने खरेदी केल्यामुळे पाळले जात नाहीत. त्यामुळे शासनास नुकसान होते. खरेदी करावयाच्या वस्तुही मानकाप्रमाणे खरेदी केल्या जात नाहीत,

ही परिस्थिती बदलण्यासाठी वस्तु खरेदीसंबंधात सर्व जिल्हा परिषदांनी सन १९९७-९८ मध्ये अवलंबिलेल्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन, अभ्यासाअंती आवश्यक वाटतील त्या सर्व समावेशक सूचना शासनाने सर्व जिल्हा परिषदांना त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी निर्गमित करण्यात याव्यात, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. वरील सूचनांची प्रत समितीला अवलोकनार्थ पाठविण्यात यावी.

५. पहिला अहवाल (२०००-२००१)

(१) एखाद्या बांधकामासंदर्भात जेव्हा निविदा निश्चित करण्यात येतात तेव्हा बांधकामाला लागणारे साहित्य उदा. सिमेंट वाळू इ. बांधकामाच्या ठिकाणी आणण्यासंदर्भात अट टाकण्यात येते की, पाच किलोमीटरच्या आतील अंतरावरुन जर ते आणले तर वाहतूक खर्च कंत्राटदाराला देण्यात येणार नाही. तथापि, उक्त साहित्य जर पाच किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावरुन आणले तर कंत्राटदारास जादा वाहतूक खर्च देण्यात येतो. समितीच्या मते बांधकामासाठी लागणारे साहित्य बांधकामाच्या ठिकाणी आणणे ही कंत्राटदाराची जबाबदारी असल्याने ५ किलोमीटरची अट अनावश्यक असल्याने वाहतुकीचे अंतर जास्त दाखवून गैरव्यवहार करण्याची संधी मिळते. सबब, ज्यादा वाहतूक खर्च देण्यासंदर्भात निविदांमध्ये समाविष्ट करण्यात येणारी पाच किलोमीटरची अट काढून टाकण्यात यावी जेणेकरुन यापुढे बांधकाम साहित्य बांधकामाच्या ठिकाणी आणण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील अशी समिती शिफारस करीत आहे.

(२) समितीच्या निदर्शनास आले की, कोणत्याही कामासाठी निविदा स्वीकारण्याबाबत शासनाच्या नियमात कोणतीही स्पष्टता व निःसंदिग्धता नाही. परिणामी एकच निविदा आली तरी ती स्वीकारली जाते व कामाच्या गुणवत्तेवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. समिती शिफारस करते की, शासनाने निविदा स्वीकारण्यासंबंधातील नियंमांमध्ये सुस्पष्ट व निःसंदिग्ध तरतूद करावी व त्याबाबतचे परिपत्रक सर्व जिल्हापरिषदांना पाठविण्यात यावे.

बारावा अहवाल (२००१-२००२)

(१) समितीने राज्यातील अनेक जिल्हापरिषदांना भेटी दिल्या. भेटी अंती समितीला आढळून आले की, बऱ्याच जिल्हयांमध्ये मागासवर्गीयांच्यासाठी असलेल्या योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध असूनही संबंधित समाजकल्याण अधिकारी त्याचे व्यवस्थित

नियोजन व संनियंत्रण करीत नसल्याने त्या वेळीच राबविल्या जात नाहीत. त्यामुळे समाजकल्याण विभागाने या योजनांचे चांगल्या प्रकारे नियोजन होण्यासाठी व या योजनांसाठी उपलब्ध होणारा ज्या वर्षाचा निधी त्याच वर्षी खर्च होण्याबाबत सतर्क राहण्यासंबंधी राज्यातील समाजकल्याण अधिकाऱ्यांना त्वरीत एक मागदर्शनपर परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

(२) समितीच्या मते शालेय पोषण आहार योजने अंतर्गत तांदूळ वाटप हया योजनेसंदर्भात शाळांना तांदूळ वेळेवर पोहोच केला जात नाही. तांदूळ पोहोंच करणाऱ्या एजन्सी रस्त्यावरील, तालुक्याच्या जवळील तसेच जिल्हयाच्या जवळील शाळांना तांदूळ पुरवठा करतात. दुर्गम भागातील शाळांना पोहोच करण्यात दुर्लक्ष करतात. सर्व शाळांना वेळेवर तांदूळ पोहोच व्हावा यासाठी विभागाने योग्य ते नियोजन व संनियंत्रण करावे अशी समितीची शिफारस आहे.

पंधरावा अहवाल (२००२-२००३)

एखाद्या दोषी अधिकाऱ्याच्या संदर्भात अनियमिततेबाबत मंत्रालयीन दोषारोपपत्र प्राप्त झाल्यानंतर चौकशी पूर्ण होण्यास दोन ते तीन वर्षाचा कालावधी घेतला जातो व हेतू पुरस्सर चौकशी पूर्ण करण्यास विलंब होत असल्यामुळे दोषी अधिकारी/ कर्मचारी अशा प्रकरणातून सही सलामत सुटतात अशी समितीची धारणा आहे. चौकशीला विलंब करणे म्हणजे एक प्रकारे अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाते असे समितीचे स्पष्ट मत आहे. तेव्हा अनियमिततेच्या अथवा भ्रष्टाचाराच्या प्रकरणात चौकशी अधिकारी नेमून मंत्रालयीन स्तरावर चौकशी एक ते दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावे व त्याप्रमाणे चौकशीचा कालावधी कमी करुन अशी प्रकरणे लवकरात लवकर निकालात काढावी व दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यावर भ्रष्टाचाराच्या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करते.

अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी प्रथमदर्शनी अधिकारी/कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्या दोषी अधिकारी/ कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई तात्काळ करण्यात यावी तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व वर्तणूक) या अधिनियमान्वये विनाविलंब कारवाई होण्यासाठी

चौकशीच्या कालमर्यादेची निश्चित मुदत अधिनियमामध्ये करण्यासाठी शासनाने सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे समितीचे मत आहे.

एकोणीसावा अहवाल (२००३-२००४)

शाळा खेल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांनी दक्षता घेऊन आवश्यक शाळा खोल्यांच्या बांधकामाची पूर्तता करण्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करावी.